खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### हुतात्मा राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धाआयोजन

पुढारी

## राजगुरुनगरला वक्तृत्व स्पर्धा

**राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने दि. २३ ऑगस्ट रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊशेठ सांडभोर यांनी ही माहिती दिली.

महाविद्यालयात दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणा दिन म्हणून साजरा होतो. त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धेच्या निमित्ताने दरवर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत विविध महाविद्यालयातील विद्यार्थी यांना वक्तृत्व शैलीचा आविष्कार दाखवण्याची संधी मिळते. स्पर्धेचे हे ३१ वे वर्ष असून, वरिष्ठ व कनिष्ठ गटात स्वतंत्रपणे होत आहे. वरिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय 'साहित्यातील गोंदण - शांता शेळके', 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव', 'महाराष्ट्राचे राजकारण : दशा, दिशा आणि सोशल मीडिया : चिंता व चिंतन' असे आहेत, तर कनिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय 'भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार : महात्मा गांधी', 'ऑफलाइन - ऑनलाइन शिक्षण', 'आई खरंच काय असते ?', 'युवाशक्ती.... राष्ट्रशक्ती' हे आहेत.

स्पर्धेसाठी दोन्ही गटांत वैयक्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक अशी विविध बक्षिसे आहेत. रोख रक्कम, प्रशस्तिपत्र आणि हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह देणार आहेत. महाविद्यालयांनी आपला दोन्ही गटांसाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, स्पर्धा संयोजन समिती प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे.

My Gramin Edition
Aug 21, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

# राजगुरूनगरमध्ये आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

## २३ ऑगस्ट रोजी आयोजन

**राजगुरुनगर, दि. १८ (प्रतिनिधी)** - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने २३ ऑगस्ट रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली.

महाविद्यालयात दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणादिन म्हणून साजरा केला जातो. हुतात्मा राजगुरूंच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेच्या निमित्ताने दरवर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत विविध महाविद्यालयात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी वक्त्यांना स्वतःच्या वक्तृत्व शैलीचा आविष्कार दाखवण्याची संधी मिळत असते. स्पर्धेचे हे ३१ वे वर्ष आहे. ही स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ गटात स्वतंत्रपणे होणार आहे. वरिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय साहित्यातील गोंदण - शांता शेळके, भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, महाराष्ट्राचे राजकारण : दशा आणि दिशा आणि सोशल मीडिया : चिंता व चिंतन असे आहेत. तर कनिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार : महात्मा गांधी, ऑफलाइन - ऑनलाइन शिक्षण, आई खरंच काय असते ?, युवाशक्ती.. राष्ट्रशक्ती हे आहेत.

या स्पर्धेसाठी दोन्ही गटांत वैयक्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक अशी विविध बक्षिसे असून त्यामध्ये रोख रक्कम, प्रशस्तिपत्रक आणि आकर्षक करंडक म्हणून हुतात्मा राजगुरू चषक व साहेबराव बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपला दोन्ही गटांसाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवून या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, स्पर्धा संयोजन समिती प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**